जा.क्र.कोजिप/जिपास्वमि/ माशिसं/ ३६/१६
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष,
जिल्हा परिषद, कोल्हापूर. दि२६/५/२०१६.

प्रति,
गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती------- (सर्व)

विषय:-स्वच्छ भारत मिशन अंतर्गत- **सर्व शाळांमध्ये 'स्वच्छतादूत आपल्या घरी' उपक्रम** आयोजनाबाबत.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कोल्हापूर जिल्हयाची वाटचाल जिल्हा हागणदारीमुक्तीकडे आहे.जिल्हयामध्ये सद्यस्थितीस एकूण १५ % कुटुंबांकडे शौचालय नाही.जिल्हा १००% हागणदारीमुक्त करणेसाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून शौचलय नसलेल्या लाभार्थ्यापर्यंत पोहचून त्यांना शौचालयाचे महत्व पटवून देवून शौचालय बांधकामास प्रवृत्त करणेचे काम जिल्हा परिषदेमार्फत सुरू आहे.

**शौचालय नसलेल्या घरी त्यांचे पाल्यचं स्वच्छता दूत म्हणून जाईल आणि शौचालय बांधणेस आपल्या पालकांना प्रवृत्त करतील या** संकल्पनेअंतर्गत शालेय विद्यार्थ्याचा सहभाग घेतल्यास स्वच्छता कार्यक्रम अधिक उठावदार होईल आणि जिल्हा हागणदारीमुक्त होणेस मदत होईल.यासाठी ज्या विद्यार्थ्यांच्या घरी वैयक्तिक शौचालय नाही अशा विद्यार्थ्यांना शाळेमध्ये स्वच्छतेचे महत्व पटवून देवून घरामध्ये शौचालय असणे किती महत्वाचे आहे हे त्यांचेमार्फत पालकांना पटवून सांगणे आवश्यक आहे. हे विद्यार्थीचं कुटुंबात आणि गावामध्ये शौचालय बांधकामासाठी **स्वच्छतादूत** म्हणून प्रभावीपणे काम करतील हा या उपक्रमाचा उददेश आहे. यासाठी जिल्हयतील प्रत्येक शाळेत खालीलप्रमाणे उपक्रम राबविणे अपेक्षित आहे.

**उपक्रमाचे स्वरुप:- खालील पध्दतीने मुख्याध्यापकांनी कार्यक्रम घ्यावयाचा आहे.**

१) शाळेच्या पहिल्या आठवडयात मुख्याध्यापक/शिक्षकांनी घरी शौचालय नसलेल्या विद्यर्थ्यांची यादी तयार करणे.
२) शिक्षकांनी त्या सर्व विद्यार्थ्यांना शौचालयाचे महत्व विषद करणे.(स्वच्छता आणि आरोग्य,शौचालय नसलेल्याचे तोटे)
३) शौचालय नसलेबाबतची कारणे काय आहेत याबाबतची माहिती जाणून घ्यावी.
४) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मिळणा-या शौचालय वापरासाठी प्रोत्सहानपर अनुदानाबाबतची र.रू.१२०००/- माहिती विद्यार्थ्यांना देणे.
५) मुलांनी घरामध्ये शौचायल बांधकामाबाबत सांगितल्यानंतर घरातील व्यक्तींकडून आलेल्या प्रतिक्रिया घेणे.
६) किती कुटुंबे शौचालय बांधकामास तयार झाली याबाबतची माहिती संकलित करणे.

शैक्षणिक सत्राच्या पहिल्या आठवडयात शाळेतील मुख्याध्यापकांनी हा उपक्रम आयोजित करावयाचा आहे याबाबत गटशिक्षणाधिकारी यांनी मुख्याध्यापकांना सूचना द्याव्यात. तसेच स्वत: काही शाळांना भेटी द्याव्यात. सदर उपक्रमाच्या संपूर्ण नियोजनाची व अंमलबजावणीची जबाबदारी गटशिक्षण अधिकारी यांची राहील.या उपक्रमाबाबतचा अहवाल इकडील कार्यालयास दि.२४/६/२०१६ अखेर सादर करणेत यावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,कोल्हापूर

प्रत माहिती व पूढील कार्यवाहीसाठी:- शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. कोल्हापूर.